Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- XII | ISSUE- X | OCTOBER | 2025 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 8.379 | ISSN 2349-638x

# प्राथमिक शिक्षकांना सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन पध्दतीचा उपयोग करतांना येणाऱ्या समस्या व त्यावरील उपाययोजना

संशोधक
प्रा. डॉ.गोकुल शामराव डामरे
स्व.उत्तमराव देशमुख अध्यापक महाविद्यालय, शेगांव

**सारांश**

*प्राथमिक शिक्षण हे पायाभुत शिक्षण आहे. प्राथमिक शिक्षणामधून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा शारीरिक, बौध्दिक, भावनिक अशा स्तरांवरील क्षमता आणि कौशल्य याचा विकास अपेक्षित असतो. त्यानुसार शिक्षणाची सर्वसाधारण उद्दिष्ट्ये निश्चित केली जातात. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होत असतांना मूल्यमापनामधून वेळोवेळी यांच्या अध्ययनातील त्रुटी, अडचणी वेळच्यावेळी दूर होऊन त्यांची उत्तम शैक्षणिक प्रगती व्हावी अशी अपेक्षा असते.*

*शिक्षण प्रक्रियेतील आजच्या घडीचे सर्वात ठळक परिवर्तन म्हणजे मूल्यमापन पध्दतीत झालेला बदल मूल्यमापन पध्दती हे सर्व शिक्षण प्रक्रियेवर आणि शिक्षण व्यवस्थेवर परिणाम करु शकते. चांगली मूल्यमापन पध्दती शिक्षण प्रक्रियेला योग्य दिशा, गती व प्रेरणा देते.*

*मूल्यमापन पध्दतीतील बदल हा अध्ययन अध्यापनातील बदलाची दिशा ठरविणारा आहे. विद्यार्थ्यांना लिहीता -वाचता तर यायला हवेच. उत्तम बोलणे, राहणे, नवीन कौशल्ये आत्मसात करणे, आपल्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास करणे हे या मूल्यमापन पध्दतीचा मूख्य हेतू आहे. म्हणून शिक्षकांना त्याच्या अभ्यासक्रमाला अनुसरुन विद्यार्थ्यांचे दैनंदिन निरीक्षणे, स्वाध्याय, कौशल्य, प्रयोग या सारख्या अनेक तंत्राचा उपयोग शिक्षकाला या पध्दतीत करावा लागतो. याच्या विद्यार्थ्यांनुसार नोंदी ठरवाव्या लागतात. प्रत्येक विषयासाठी इयत्तेसाठी ही साधने वापरावी लागतात. वर्षभर सातत्याने त्यात बदल होत असतो आणि नंतर त्यावरुनच विद्यार्थ्यांची श्रेणी ठरविली जाते. संपूर्ण ही प्रक्रिया राबवितांना शिक्षकांना अनेक समस्या उद्भवतात. त्यांच्या नोंदी ठेवणे, निरीक्षणे लिहणे या माहितीवरुन प्रश्नपेठ्या निर्माण करणे. यामध्ये गुणवत्ता व दर्जा राखण्यासाठी शिक्षकांना येणाऱ्या समस्यांवर विचार व्हायला हवा.कारण निर्णय घेडुन चालत नाही अशा बदलांसाठी पोषक वातावरण निर्मीती व्हायला हवी. मूळ संकल्पना स्पष्ट व्हायला हवी कारण वास्तविक कामात अनेक अडचणी निर्माण होत असतात. त्यावर मात करुन या मूल्यमापन पध्दतीचा दर्जा सुधारण्यास मदत होईल. यामुळे शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यास हातभार लागेल. म्हणून या समस्यांचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे.*

**मुख्य शब्द :** सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन पध्दती

## संशोधन निबंधाचे शीर्षक

प्राथमिक शिक्षकांना सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन पध्दतीचा उपयोग करतांना येणाऱ्या समस्या व त्यावरील उपाययोजना.

## संशोधन निबंधाचे उद्दिष्ट्ये

i.आकारिक व संकलित पध्दतीचा आढावा घेणे.

ii. आकारिक व संकलित मूल्यमापनाविषयी प्राथमिक शिक्षकांचा दृष्टिकोन जाणून घेणे.

iii.आकारिक व संकलित मूल्यमापन पध्दती राबवितांना प्राथमिक शिक्षकांना येणाऱ्या समस्यांचा आढावा घेणे.

iv.आकारिक व संकलित मूल्यमापन पध्दती राबवितांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

**परिकल्पना:**

i. आकारिक व संकलित मूल्यमापन पध्दतीत शिक्षकांना अडचणी जाणवतात.

**संशोधन पध्दती निवड**

संबंधीत संशोधन हे वर्तमान काळाशी संबंधीत असल्यामुळे प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण वा सर्वेक्षणात्मक संशोधन पध्दतीची निवड करण्यात आली आहे.

**न्यादर्श निवड:-**

प्रस्तुत सशोधनात सुगम (साधा) यादृच्छिक पध्दतीचा वापर करण्यात प्राथमिक शिक्षकांची निवड करण्यात आली आहे. यासाठी १०० प्राथमिक शिक्षकांची निवड करण्यात आली तसेच १० मुख्याध्यापकांची निवड सुगम यादृच्छिक पध्दतीने करण्यात आला आहे.

**संशोधन साधनांची निवड:-**

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने शिक्षकांसाठी प्रश्नावलीचा अवलंब केला तर मुख्याध्यापकांसाठी मुलाखत सूची या साधनांचा वापर करण्यात आला आहे.

**निष्कर्ष**

१) मूल्यमापन पध्दतीतून केवळ विद्यार्थ्यांच्या बौध्दिक क्षमतेचाच विचार केल्या जातो. तर आकारिक व संकलित मूल्यमापनात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासाकडे अधिक लक्ष दिले जाते. असा निष्कर्ष मुख्याध्यापकांच्या मुलाखत सूचीवरुन दिसून येतो.

२) आकारिक व संकलित मूल्यमापनाबाबत शिक्षकांना अनेक समस्या जाणवत असतात. त्या समस्यांवर उपाय म्हणून प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले जाते. सर्व शिक्षा अभियानामार्फत घेण्यात येणाऱ्या सर्वच प्रशिक्षण वर्गांना शिक्षकांना पाठविले जाते. असा निष्कर्ष मुख्याध्यापकांच्या मुलाखतीवरुन दिसत आला.

३) मुल्यमापन पध्दतीत सतत बदल होत आहे. त्यामुळे त्यात अडचणी निर्माण होतात त्या सोडविण्यासाठी शिक्षकाविषयी सभा, चर्चासत्र आयोजित करण्यात येतात. विद्यार्थी अनुपस्थिती याविषयी त्यांच्यात जागरुकता वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांशी चर्चा केली जाते असा निष्कर्ष मुख्याध्यापकांच्या मुलाखत सुचीवरुन दिसून येतो.

४) शिक्षक हे आपल्या विषयानुरुप साधनतंत्राची निर्मिती करतात. तसेच आवडीनुरुप साधनतंत्राची निर्मिती केली जातात. विद्यार्थ्यांची साधनतंत्रे निर्मितीत सहभाग वाढविण्यासाठी चर्चा केली जाते. वेळोवेळी मार्गदर्शन व तंज्ञांची सल्लामसलत सुचीवरुन दिसून येतो. मुख्याध्यापकांच्या मुलाखत सुचीवरुन दिसून येतो.

५) अध्ययन व मूल्यमापन या दोन्ही गोष्टी एकमेकांवर अवलंबून आहेत. अध्ययनासोबतच मूल्यमापन हे केले जाते. म्हणून वार्षिक नियोजन करित असतांनाच त्यात मूल्यमापनाविषयी तरतूद केली जाते त्यात थोडीफार लवचिकता दिसून येते. असा निष्कर्ष मुलाखत सूचीवरुन दिसून येतो.

६) शैक्षणिक सत्राच्या सुरुवातीला व पालक आकारिक व संकलित मूल्यमापनाविषयी माहिती देण्यात येते यासाठी पालक सभा घेतली जाते. विद्यार्थी सहभाग वाढविण्यासाठी स्पर्धा, खेळ, प्रश्नमंजुषा इ. घेण्यात येतात. असा निष्कर्ष मुलाखत सुचीवरुन दिसून येतो.

७) अध्यापन व मूल्यमापन सोबतच होत असते. म्हणून शिक्षकच ते उत्तम रितीने पार पाडू शकतात. त्यात शिक्षकच हा तज्ञ असतो. म्हणून अन्य तज्ञ व्यक्तिची नेमणूक करणे गरजेचे नसते. असा निष्कर्ष मुलाखत सूचीवरुन दिसून येतो.

८) आकारिक व संकलित मूल्यमापनातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत मिळते. विद्यार्थ्यांचे सतत मूल्यमापन होण्याने त्यात सुधारणा होतात असा निष्कर्ष मुख्याध्यापकांचा मुलाखत सूचीवरुन दिसून येतो.

९) दिर्घोत्तरी प्रश्नांना समान संधी मिळत नाही यात लेखीकाम मोठ्या प्रमाणावर दिसून येते. विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याकारणाने नोंदी ठेवण्यास अडचणी जाणवते. शिक्षक व विद्यार्थी, पालक यांच्यात अल्प प्रमाणात यात जागरुकता दिसून येत नाही. असा निष्कर्ष मुख्याध्यापकांच्या मुलाखत सूचीवरुन दिसून येतो.

१०) आकारिक व संकलित मूल्यमापनात शिक्षकांच्या कल्पनाशक्तीला मोठ्या प्रमाणात वाव असते. उपक्रम, साधनतंत्राची निर्मिती करण्यासाठी सर्जनशिलता वाढण्यास मदत मिळते. नवोपक्रम करण्यासाठी विचार

प्रक्रियेला चालना यातुन मिळेल. असा निष्कर्ष मुख्याध्यापक सूचीवरुन दिसून येतो.

**संशोधन निबंध शिफारशी**

१) आकारिक व संकलित मुल्यमापनाविषयी शिक्षकांना येणाऱ्या अडचणी दूर होण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात.

२) विद्यार्थ्यांचा सातत्याने विकास होईल यासाठी शिक्षकांनी ही पध्दती योग्य रितीने अंमलबजावणी करावी.

३) शिक्षक व विद्यार्थी यांच्यात चांगले संबंध प्रस्थापित व्हावे यासाठी शिक्षकासाठी शिक्षकांनी प्रयत्न करावे.

४) वेळेचे व अध्यापनाचे नियोजन शिक्षकांनी शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच करावे.

५) प्रत्येक वर्गानुसार तक्ते बनविण्यासाठी शिक्षकांनी नवीन तंत्राचा वापर करावा.

६) विषयानुसार तक्ते बनविण्यासाठी शिक्षकानी योग्य नियोजन करावे.

७) दैनंदिन नोंदी करतांना शिक्षकांनी वस्तुनिष्ठ रितीने त्या होण्यासाठी सजग असावे.

८) शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे वैयक्तिक मूल्यमापन काटेकोरपणे राहील यावर अधिक भर द्यावा.

९) शिक्षकांनी अनौपचारिक स्वरुपात घ्यावयाच्या चाचणीत पारदर्शकता आणावी.

१०) विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना मूल्यमापनातुन अधिक वाव मिळण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करावे.

**संदर्भ सूची.**

१) अहेर हिरा, (१९९५), "उद्योन्मुख भारतातील शिक्षक व शिक्षण" नागपुर, विद्याप्रकाशन.

२) आगलावे प्रदिप, (२०००), "संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे", नागपूर, विद्याप्रकाशन

३) आलोनी अर्चना, (२००९), "शैक्षणिक तंत्रविज्ञान व व्यवस्थापन" नागपूर, पिंपळापूरे अँड कंपनी

४) कऱ्हाडे ब. म., (२००७), "शास्त्रीय संशोधन पध्दती, नागपुर, पिंपळापुरे अँण्ड कं. पब्लिशर्स

५) कदम चा. प., (२००७), "शैक्षणिक संख्याशास्त्र", पुणे, नित्यनूतन प्रकाशन

६) कुलकर्णी विश्वंभर, (२००६), "आधुनिक शिक्षण समस्या व उपाय', पुणे, नित्यनुतन प्रकाशन

७) गाजरे चिटणीस, (२००६), "शिक्षणाचे अधिष्ठान", पुणे, नित्यनुतन प्रकाशन.

८) घोरमोडे कृष्णा, (२००६), "शैक्षणिक कृति संशोधन", नागपूर, विद्याप्रकाशन

९) घोरमोडे कृष्णा, कला (२००६), "शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे", नागपूर, विद्याप्रकाशन